# प्रेसनोट

दि.०७/०६/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा· नोंद क्रमांक | कर्जत पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आण्णासाहेब बाबुराव चव्हाण, वय–५२ वर्ष, पोहेकॉ/१९४३, वर्ग–३, नेमणुक– राशिन दुरक्षेत्र, कर्जत पोलीस स्टेशन, ता.कर्जत, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे विरुध्द कर्जत पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयांमध्ये मदत करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक आण्णासाहेब बाबुराव चव्हाण, यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रुपये ची मागणी केली होती. तक्रारदार यांनी याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर येथे दिलेल्या तक्रारीवरुन दि.०६/०६/२०२२ रोजी कर्जत येथे केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रुपयेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/– रुपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज रोजी राशिन येथे आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक याने लाचेची रक्कम रुपये २०,०००/– पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन भिगवण रोडवरील खरात हॉस्पिटल समोर, स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द कर्जत पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीश खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर